Estd. 1962

"A++" A ccredited by NAAC (2021)

With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शु ध्दी प त्र क

**संदर्भ :- १) जा.क्र.आस्थापना-२/५४ दि. ३०/०४/२०२५**

**२) जा.क्र.आस्थापना-२/१९७ दि.०९/०३/२०२६**

उपरोक्त संदर्भिय क्र. २ च्या परिपत्रकानुसार विद्यापीठातील वर्ग ३ व ४ मधील शिक्षकेत्तर सेवकांसाठी शासन निर्णयातील नमूद पाच गंभीर व इतर २८ आजारांसाठी वैद्यकीय तसलमात मंजूर करण्याबाबत तसेच तसलमात रक्कमेचे समायोजन करण्याबाबतची नियमावली प्रसिध्द करण्यात आली होती.

आता, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या दि. ०२ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार, वैद्यकीय तसलमात रक्कमेबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

विद्यापीठ वेतन अनुदान योजनेखालील शिक्षक तसेच वर्ग १ व २ मधील अधिकारी यांना त्यांच्या मागणीनुसार तसेच डॉक्टरांनी दिलेल्या खर्चाच्या प्रमाणपत्रानुसार शासन निर्णयातील पाच गंभीर आजारांसहित इतर २८ आकस्मिक आजारांकरीता रू. १,५०,०००/- (कमाल मर्यादेपर्यंत) वैद्यकीय तसलमात देण्यात येईल. तसेच वैद्यकीय तसलमातसंदर्भातील अटी व शर्ती यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या संदर्भ क्र.१ व २ च्या परिपत्रकातील लागू राहतील.

**कुलसचिव**

**जा.क्रं. - आस्थापना-२/** 217
**दिनांक -** 20 MAR 2026

**प्रति,**

1. **सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.**
2. **सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.**
3. **इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक www.unishivaji.ac.in/intranet** - Category - Medical Reimbursement Form **या सदरात प्रसिध्द करावे.**

**प्रत :- माहितीस्तव.**

**मा.प्रभारी कुलगुरू, मा. प्रभारी प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, तसेच मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय**